श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
☎ : 022-62491111 / 62491112

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www. siddhivinayak.org
email :admin@siddhivinayak.org
info@siddhivinayak.org

# दरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

विषय : बुधवार, दि. ०१ जानेवारी, २०२५ या उत्सवासाठी भाविकांसाठी रविंद्र नाटय मंदिर – दादर स्टेशन परत दादर स्टेशन – रविंद्र नाटय मंदिर अशी बस सेवा भाडेतत्वावर घेण्याकरीता सिलबंद दरपत्रके मागविण्याबाबत.

अंगारक संकष्ट चतुर्थी बुधवार, दि. ०१ जानेवारी, २०२५ या उत्सवासाठी विविध प्रकारचे साहित्य व वस्तू भाडेतत्वावर घेण्याकरीता सिलबंद दरपत्रके मागविण्याबाबतची संपूर्ण माहिती, अटी व शर्ती न्यासाच्या www.siddhivinayak.org या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे.

**अटी व शर्ती –**

१. सिलबंद लखोटयावर ठळक अक्षरात दरपत्रकाचा विषय स्पष्टपणे नमूद करावा. तांत्रिक दरपत्रक तपशील व मूल्य दरपत्रक तपशील इच्छूक व्यक्ती/एजन्सी/कंपनी यांनी आपली वैयक्तीक माहिती, मोबाईल क्रमांक याप्रमाणे दोन वेगवेगळया लखोटयामध्ये भरुन सिलबंद करुन न्यास कार्यालयात दि. १०/१२/२०२४ रोजी दुपारी ०१.०० वाजेपर्यंत न्यासाच्या नोंदणी शाखेत सादर करावी.

२. दरपत्रक भरतांना सर्व प्रकारचे कर मिळून (प्रति बस) एकत्रित रक्कम भरावी. दरपत्रक भरताना न्यासाने दिलेल्या दरपत्रकात भरून देणे आवश्यक व गरेजेचे आहे. न्यास दरपत्रकात दर भरून न दिल्यास सदर कंपनीस अपात्र ठरविण्यात येईल. सर्व उत्सवांसाठी कमी दर असणाऱ्या दरपत्रकधारकांस काम देण्यात येईल.

३. पुरवठादाराकडून पुरवठा करण्यात येणाऱ्या वाहनाचा परवाना व वाहतुक विभागाने निर्देशित केल्यानुसार सर्व आवश्यक कागदपत्रे असणे आवश्यक राहील. तसेच परवानाधारक वाहनचालकाची नेमणूक करावी. वाहनचालकाने वाहतुकीच्या सर्व नियमांचे पालन करणे आवश्यक राहील. वाहन मध्येच बंद पडल्यास अशा परिस्थितीत वाहन उपलब्ध करून देण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील.

४. जेवढया फेऱ्या होणार त्यानुसार प्रत्येक फेरी झाली की त्याच्यावर तिथे उपस्थित न्यास कर्मचारी यांची स्वाक्षरी घेण्यात यावी. (१ फेरी रविंद्र नाटय मंदिर ते दादर स्टेशन परत दादर स्टेशन ते रविंद्र नाटय मंदिर अशी धरण्यात येईल). याची पोहच पावती बिलासोबत जोडण्यात यावी.

५. आपण केलेल्या कामाचा सविस्तर अहवाल देयकासोबत जोडण्यात यावा.

६. न्यासाकडून कोणतेही आगाऊ प्रदान केले जाणार नाही. न्यासाच्या परवागनीशिवाय कोणतेही अतिरिक्त काम करण्यात आल्यास केलेल्या कामाचा जादा मोबदला आपणास देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. न्यासास बिल सादर करताना बिलासोबत पॅनकार्ड/जीएसटी क्रमांकाचा तपशील व कंपनीच्या बॅकेचा तपशील (बॅकेचे नांव, खाते क्र., आयएफएसी कोड) जोडावा.

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई
S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
☎ : 022-62491111 / 62491112
(Controlled by Govt. Of Maharashtra)
www. siddhivinayak.org
email :admin@siddhivinayak.org
info@siddhivinayak.org

७. कर्मचारी भरपाई अधिनियम १९२३ या कायद्याअंतर्गत आपणावर सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

८. माहितीची आवश्यकता असल्यास श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई कार्यालयात दूरध्वनी क्र. ०२२–६२४९११११/१११२ वर न्यासाचे पर्यवेक्षक श्री. मंगेश कुंटे देखभाल व दुरूस्ती विभाग यांच्याशी संपर्क साधावा.

९. नियमानुसार आवश्यक आयकर रक्कमेची कपात करणेत येईल. तसेच सर्व प्रकारचे कर अदा करणेची
जबाबदारी दरपत्रकधारक यांची राहील.

१०. दरपत्रकधारकाने GST क्रमांक व PAN कार्ड दरपत्रकांत नमूद करावा व दरपत्रकासोबत जोडावा.

११. दरपत्रकधारकाने GST क्रमांक लागू नसल्यास, कंपनी लेटरहेडवर तसे नमूद करून न्यास दरपत्रकासोबत
सादर करावे.

१२. दि. ११/१२/२०२४ रोजी दुपारी ०४.०० वाजता दरपत्रके उघडण्यात येतील. दरपत्रके उघडताना दरपत्रकधारकाने सदर दिवशी उपस्थित रहाणे आवश्यक आहे. दरपत्रकधारक दरपत्रके उघडताना उपस्थित न राहिल्यास दरपत्रक उघडल्यानंतर आपले कोणतेही म्हणणे मान्य केले जाणार नाही. दरपत्रके उघडल्यानंतर दरपत्रकामध्ये कोणतेही बदल करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

Vpatil

कार्यकारी अधिकारी

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई
S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
☎ : 022-62491111 / 62491112
(Controlled by Govt. Of Maharashtra)
www. siddhivinayak.org
email :admin@siddhivinayak.org
info@siddhivinayak.org

# दरपत्रकाचा तपशील

विषय : खाजगी मिनी बस भाडेतत्वावर मागविण्याबाबत.

नाव:------------------------------------------------------------------------

पत्ता:------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

कंपनी नोंदणी क्रमांक : ...................... जीएसटी क्रमांक : ...................... पॅन कार्ड क्रमांक : ..................

| अ.क्र. | तपशील | एकूण नग | दर (सर्व करांसहित) (प्रति बस) |
|---|---|---|---|
| | मंगळवार, पहाटे ६.०० वाजेपासून ते मंगळवार रात्रौ १०.०० वाजेपर्यंत ( १ दिवसाकरीता ) | | |
| १ | खाजगी मिनी बस २० सीटर ( वाहनचालक, डिझेल सह) | २० | |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का